प्रेसनोट

----------------

## सराईत गुन्हेगार अजय संजय जाधव पुणे शहर व जिल्हयातुन दोन वर्षासाठी तडीपार

---

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी पुणे शहरात कोणताही अनुचित प्रकार घडु नये व आपले गुन्हेगारी कृत्याने वर्चस्व निर्माण करणारे टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व अशा गुन्हेगारांविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना आदेश दिलेले आहेत.

खडक पोलीस स्टेशन पुणे चे अभिलेखावरील सराईत व अट्टल गुन्हेगार **अजय संजय जाधव वय-३१ रा - साईबाबा मंदीर समोर कासेवाडी भवानी पेठ पुणे** हा सन २००७ पासुन गुन्हेगार क्षेत्रात कार्यरत आहे त्याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तसेच पुणे शहरातील **स्वारगेट व इतर पोलीस स्टेशन येथे चोरी, इतर चोरी, दंगा मारामारी, गंभीर दुखापत, घातक शस्त्र जवळ बाळगणे तसेच खंडणी मागणे , तडीपार आदेशाचे भंग करणे असे एकुण पंधरा गुन्हे दाखल आहेत.** त्यास यापुर्वी सन २०१४ मध्ये त्याने कोणत्याही प्रकारे गुन्हेगारी कृत्य करु नये म्हणुन त्याचेविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तसेच सन २०१० मध्ये पुणे शहर व जिल्हयामधुन एक वर्षाकरिता तडीपार करण्यात आले होते परंतु त्याचे वागण्यामध्ये काहीही फरक पडलेला नव्हता.

नमुद सराईत गुन्हेगार **अजय संजय जाधव** याचेविरुध्द वेळोवेळी कारवाई करुनही त्याचे वागणुकीत काहीएक फरक पडलेला नव्हता त्याने या भागात आपली भयंकर दहशत निर्माण केली होती त्याचे दहशतीमुळे व भितीपोटी त्याचेविरुध्द कोणीही तक्रार देण्यास पुढे येत नव्हते त्याचे अशा कृत्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे मनात भिती निर्माण होवुन त्याचे जिवितास व मालमत्तेस धोका निर्माण झाला होता त्याचे भिती पोटी व दहशतीमुळे त्याचेविरुध्द कोणी साक्ष देण्यास पुढे येत नव्हते. **त्यास पुणे शहर व जिल्हयामधुन हददपार करण्याबाबतचा प्रस्ताव डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त परिमंडळ - १ पुणे शहर यांचेकडे पाठविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी त्यास पुणे शहर व पुणे जिल्हा कार्यक्षेत्रा मधुन दिनांक – ०४/०१/२०१८ रोजी पासुन दोन वर्षाकरिता तडीपार केलेले आहे.**

**अशाप्रकारे पोलीसांनी समाजकंटक सराईत व अटटल गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे व त्यांचेविरुध्द कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.**

शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी सर्फराज शेख, महेश बारवकर, महेश कांबळे, अनिकेत बाबर यांनी सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे.

खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – ०५/०१/२०१८

## प्रेसनोट

---

## अल्पवयीन मुलींची टिंगल टवाळी करणा-या दोघांना न्यायालयाने ठोठावली एक वर्ष कैदेची शिक्षा

---

दिनांक – ०३/०६/२०१४ रोजी घटनेबाबत अल्पवयीन मुलीने खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे. दिनांक - २८/०६/२०१४ रोजी सकाळी ०७/३० वा चे सुमारास अल्पवयीन मुलगी घरातुन कॉलेजला जात असताना सोनमार्ग टॉकीज नेहरु रोड पुणे चे समोर यातील आरोपी १) अजय बापु शेंडगे वय – २० रा – ५४ अेपी लोहीयानगर पुणे २) चेतन मारुती साठे वय – १९ रा - सदर यांनी मुलीच्या मागे जावुन तिचा पाठलाग करुन तिस मोबाईल नंबर मागीतला त्यावेळी तिन काय रे तु माझा पाठलाग का करतोस माझा मोबाईल नंबर का मागतोस असा जाब विचारला व घरातील लोकांना सांगु का ? असे म्हणाली त्यानंतर दिनांक - ०२/७/२०१४ रोजी रात्रौ ०७.४५ वा. चे सुमारास अल्पवयीन मुलगी रहाते घराचे समोरील बेकरी मध्ये जात असताना आरोपींनी तिला पाहुन व उददेशुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे गैरवर्तन केले होते त्याबाबत तिने पोलीसांकडे तक्रार दिलेली होती व पोलीसांनी आरोपीं विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम ३५४ (ड), ३४ व लैंगिक अत्याचारापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १२ अन्वये गुन्हा दाखल केला होता.

मा. जे. टी. उत्पात सो विशेष न्यायाधिश शिवाजी नगर कोर्ट पुणे यांचे न्यायालया मध्ये केसची सुनावणी झाली आहे त्यामध्ये मा. न्यायाधिश यांनी यातील **आरोपी नं १) अजय बापु शेंडगे वय – २३` यास एक वर्ष सक्त मजुरी व एक हजार रुपये दंड व दंड न भरल्यास एक महिना सक्त मजुरी व आरोपी नं २) चेतन मारुती साठे वय – २२ यास सहा महिने सक्त मजुरी व पाचशे रुपये दंड व दंड न भरल्यास पंधरा दिवस सक्त मजुरी अशी शिक्षा ठोठावली आहे.**

मा. न्यायालयात सरकार पक्षातर्फे पोलीस अभियोक्ता म्हणुन श्रीमती हिरा बारी व श्री सुनिल हांडे यांनी बाजु मांडली आहे. सदर गुन्हयाचा तपास खडक पोलीस स्टेशन पुणे चे पोलीस उप निरीक्षक संजय गायकवाड यांनी केला आहे पोलीस कर्मचारी शाम लोहोमकर व भरत जरांडे यांचा तपासात सहभाग होता . तसेच न्यायालयात पैरवी अधिकारी म्हणुन महिला पोलीस उप निरीक्षक मिना तडवी व सहायक पोलीस उप निरीक्षक दिलीप मांडेकर यांनी काम पाहीले आहे.